प्रेस नोट

चोरी झालेले/गहाळ झालेले हस्तगत मोबाईल, मोटार सायकल व इतर मौल्यवान वस्तुंचे पुर्नहस्तांतरन कार्यक्रम बाबत प्रेसनोट

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. पोलीस सह आयुक्त (का व सु), मुंबई व मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ - १, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली दक्षिण परिमंडळ-१, मुंबई अंतर्गत कुलाबा, कफ परेड, मरीन ड्राईव्ह, आझाद मैदान, मा.र.आं.मार्ग, डोंगरी व सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणेमध्ये मोबाईल हस्तगत करण्यासाठी दक्षिण परिमंडळ १ स्तरावर विशेष मोहिम राबविण्यात आली.

सदर मोहिमे दरम्यान मुंबई, महाराष्ट्र व इतर राज्यातून एकुण २३८ मोबाईल हस्तगत केले होते. सदरचे मोबाईल हे नमूद पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण अधिकारी व अंमलदार यांनी **CEIR** पोर्टलवर प्राप्त माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे मुंबई शहर तसेच भारतातील विविध राज्यातून हस्तगत करून उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. तसेच गोपनीय माहितीच्या आधारे चोरी केलेल्या एकुण १९ मोटार सायकल, तसेच इतर मौल्यवान वस्तू असे एकूण २ कोटी ३१ लाख ५१ हजार २८७ रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

मुंबई पोलीस दलाच्या वतीने पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ - १, मुंबई यांनी हस्तगत मोबाईल, मोटार सायकल सोने, इतर मौल्यवान वस्तू मुळ मालकांना परत करण्याकरीता दिनांक ०६/११/२०२६ रोजी प्रेरणा हॉल, आझाद मैदान येथे पुर्नहस्तांतरन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमामध्ये हस्तगत केलेल्या २३८ मोबाईल, १९ मोटार सायकल, इतर मौल्यवान वस्तूच्या मुळ मालकांना बोलावण्यात आले होते. त्यापैकी १५० पडित नागरीक कार्यक्रमाकरीता उपस्थित होते, त्यांना पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ १, मुंबई श्री. मनीष कलवानिया यांचे हस्ते त्यांचे मोबाईल फोन, मोटार सायकल, इतर मौल्यवान वस्तू परत करण्यात आले. सदरवेळी पडित नागरीकांनी त्यांचे चोरीस गेलेल्या वस्तु परत मिळाल्याबाबत आनंद झाल्याचे व्यक्त करून मुंबई पोलीस दलाचे अभिनंदन करून आभार मानले आहेत.